# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय :- एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेशाबाबत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पारंपारिक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली आले होते. सबब, विद्यापीठ अनुदान आयोगाने तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांबाबतचे UGC (Affiliation of Colleges offering Technical Education by Universities) Regulation 2014 लागू केले. सदर Regulations मध्ये एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षासाठी (Lateral Entry) प्रवेशाची तरतूद नसल्याने मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दालनात दि. ०३/०४/२०१४ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षासाठी (Lateral Entry to Second Year) कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थी प्रवेशित करू नयेत असे सर्व संलग्न एम.सी.ए. महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांना सं.क्र. संलग्नता/टी-२/१४, दि. ०७ मे, २०१४ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

तद्नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पारंपारिक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम पुन्हा सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षासाठी एआयसीटीईच्या अधिपत्याखाली आल्याने पुन्हा एआयसीटीई व डीटीईचे रेग्युलेशन्स सदर महाविद्यालयांना लागू झाले. त्यायोगे एआयसीटीई/डीटीईच्या ब्राऊचरमध्ये नमूद केल्यानुसार एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेशास (Lateral Entry to Direct Year) मान्यता देण्यात आल्या आहेत.

कळावे.

आपला विश्वासू,
(सही)
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.: संलग्नता टी-२/एमसीए/थेट द्वितीय वर्ष प्रवेश/ No 5131
दि. 30 JUL 2014

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न एम.सी.ए. महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.